# श्री स्वामी समर्थ आरती

जय जय सद्-गुरु स्वामी समर्था, आरती करु गुरुवर्या रे ।

अगाध महिमा तव चरणांचा, वर्णाया मति दे यारे ॥धृ॥

जय जय सद्-गुरु स्वामी समर्था, आरती करु गुरुवर्या रे।

अक्कलकोटी वास करुनिया, दाविली अघटित चर्या रे।

लीलापाशे बध्द करुनिया, तोडिले भवभया रे ॥१॥

जय जय सद्-गुरु स्वामी समर्था, आरती करु गुरुवर्या रे ।

यवन पूछिले स्वामी कहा है, अक्कलकोटी पहा रे ।

समाधी सुख ते भोगुन बोले, धन्य स्वामीवर्या रे ॥२॥

जय जय सद्-गुरु स्वामी समर्था, आरती करु गुरुवर्या रे ।

जाणिसे मनीचे सर्व समर्था, विनवू किती भव हरा रे ।

इतुके देई दीनदयाळा, नच तव पद अंतरा रे ॥३॥

जय जय सद्-गुरु स्वामी समर्था, आरती करु गुरुवर्या रे ।

Visit Website : https://www.PDFSeva.Net